अपील अधिकारी तथा सामान्य प्रशासन विभाग
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
शिवाजीनगर पुणे ४११००५
दूरध्वनी क्र. ०२०-२५५०११२३
ई मेल aadmcgeneral@punecorporation.org
अपील क्र.०२/२०२४

जा.क्र उआ(सा.प्र.)/ आस्था/११९७६ दि. ०५ /२/२०२४

अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त , सामान्य प्रशासन विभाग, पुणे महानगरपालिका
अपील क्रमांक : पुणे मनपा/अ.प्रा.उआ(सा.प्र.)/अपिल/०२/२०२४

प्रति,
श्री.अविनाश रामचंद्र रिठे,
रा.रिठे हाऊस, डावखरे बिल्डींग जाधववस्ती
कळसगाव, आळंदी मार्ग, पुणे-४११०१५
यांस

---------------- अपिलार्थी

विरुद्ध

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी**
आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका

श्री.अविनाश रामचंद्र रिठे, रा.रिठे हाऊस, डावखरे बिल्डींग जाधववस्ती कळसगाव, आळंदी मार्ग, पुणे-४११०१५ (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांनी स्वागत कक्षमध्ये अर्ज दाखल केला होता. महापालिका आयुक्त कार्यालयाने सदर अर्ज जा.क्र.स्वागत/१०२६४, दि.११/१२/२०२३ ने आरोग्य विभाग व उप आयुक्त, सामान्य प्रशासन विभागाकडे वर्ग करण्यात आला आहे. इकडील कार्यालयास दि.१५/१२/२०२३ रोजी (आ.क्र.१५५४२ दि.१५/१२/२०२३) अन्वये माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अर्ज प्राप्त झाला आहे.

अपिलार्थी यांचे मूळ अर्जातील माहिती बाबत जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी जा.क्र.जमाअ/आस्था/१०५४०, दि.०१/०१/२०२४ अन्वये अर्जास माहिती दिलेली आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जावरील दिनांक | अर्ज प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचा दि. | माहिती द्यावयाचा अंतिम दि. | अपिलार्थीस उत्तर/माहिती पाठविल्याचा दि. | विलंब दिवस |
| ०९/१२/२०२३ | १५/१२/२०२३ | १४/१/२०२४ | ०१/०१/२०२४ | ० |

अपिलार्थी यांनी "दि.०९/११/२०२२ रोजी मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना पुणे मनपा आरोग्य विभागाच्या दहा वर्षातील कामाची श्वेतपत्रिका काढण्याबाबत, निवेदन दिले होते सदर निवेदन नगर विकास वि.कडून उचित कार्यवाही करिता आयुक्त मनपा यांना वर्ग करण्यात आलेल्या पत्रावरील कारवाईचा तपशील", असे दि.१३/१/२०२४



२८

रोजी नमूद करुन अर्ज दाखल केला आहे. इकडील कार्यालयाचा आ.क्र.१७५३७ दि.१३/१/२०२४ रोजी अर्ज प्राप्त झाला आहे.

| अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अपील अर्जाचा दिनांक | अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दि. | अपील दाखल करावयाचा अंतिम दि. | अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | अपील अर्जाच्या विलंब बाबत निवेदन दिले आहे का? |
| १३/१/२०२४ | १३/१/२०२४ | १३/१/२०२४ | होय | -- |

अपिल सुनावणी दिनांक ३१/१/२०२४ रोजी सकाळी ११.३० वा. ऑनलाईन सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीस अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी ,आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका हे उपस्थित होते.

## विवेचन

अपिलार्थी यांनी "दि.०९/११/२०२२ रोजी मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना पुणे मनपा आरोग्य विभागाच्या दहा वर्षातील कामाची श्वेतपत्रिका काढण्याबाबत, निवेदन दिले होते सदर निवेदन नगर विकास वि.कडून उचित कार्यवाही करिता आयुक्त मनपा यांना वर्ग करण्यात आलेल्या पत्रावरील कारवाईचा तपशील", असे अपिल अर्जात नमूद केले आहे.

जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग पुणे महानगरपालिका यांनी माहिती अधिकारात अर्जास जा.क्र.जमाअ/आस्था/१०५४०, दि.०१/०१/२०२४ रोजीचे पत्रान्वये दिलेले उत्तर व अपिलार्थी यांचे लेखी म्हणणे पुढील प्रमाणे.

| अ. क्र. | विचारलेली माहिती | माहिती |
|---|---|---|
| १. | दि.०९/११/२०२२ रोजी मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना पुणे मनपा आरोग्य विभागाच्या दहा वर्षातील कामाची श्वेतपत्रिका काढण्याबाबत, निवेदन दिले होते सदर निवेदन नगर विकास वि.कडून उचित कार्यवाही करिता आयुक्त मनपा यांना वर्ग करण्यात आलेल्या पत्रावरील कारवाईचा तपशील" | सोबत प्रत जोडली आहे-पान १ |

अपिलार्थी यांनी "आरोग्य विभागाकडून माहिती प्राप्त झालेली नाही", असे सुनावणी दरम्यान नमूद केले. आस्थापना विभागा जा.क्र.सा.प्र/आस्था/प्र७/३११४ दि.२६/६/२०२३ रोजी माहिती अधिकार अर्जात नमूद केलेल्या विषयाचे अनुषंगाने "मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) यांचेमार्फत मा.महापालिका आयुक्त यांजकडेस सादर करणेत यावा. तसेच केलेल्या कार्यवाहीची माहिती संबंधितास परस्पर कळवून त्याची प्रत या विभागास माहितीकरिता सादर करावी" असे नमूद करुन आरोग्य विभागास माहिती देणेबाबत कळविले आहे. सुनावणीस आरोग्य विभागाचे जन माहिती अधिकारी उपस्थित होते. जन माहिती अधिकारी आस्थापना यांनी अर्ज वर्ग केलेबाबतची माहिती दिलेली आहे, तथापि

आरोग्य विभागाने कार्यवाही केलेली नसल्याचे व माहिती उपलब्ध करुन दिली नसल्याचे निदर्शनास येत आहे. सदर विवेचनाअंती पुढील प्रमाणे आदेश पारित करणेत येत आहे.

## आदेश

जन माहिती अधिकारी, आस्थापना विभाग यांनी जन माहिती अधिकारी, आरोग्य विभाग यांना या अनुषंगाने पत्र देऊन माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देणेबाबत कळवावे व माहितीची एक प्रत सामान्य प्रशासन विभागास उपलब्ध करुन देणेबाबत पत्रात नमूद करावे. त्यानुसार, सदर अपिल क्र.०२/२०२४ निकाली काढण्यात येत आहे.

(सचिन इथापे)
अपिलीय प्राधिकारी तथा
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका

---

सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या मुदतीत मा.आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, पुणे-१ यांचेकडे व्दितीय अपिल करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतुद आहे.

सदर निकालाची प्रत पुणे मनपाच्या www.punecorporation.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**प्रत/-**
जन माहिती अधिकारी,
आस्थापना विभाग,
पुणे महानगरपालिका.